FLUX ELECTRONICA INDIA PRIVATE LIMITED

AN ISO 9001:2015 Certified Company

Address: Office No.08, 1st Floor, Chaitanya Industrial Estate, Manajainagar, Narhe, Pune-411041, Maharashtra, INDIA.

Contact:+91 7784849797 / +91 7784849898

Email: contact@fluxelectronica.com | Web: www.fluxelectronica.com

स्वयंम सिंगल फेज डिजिटल स्टार्टर मोबाईल ऑटो सह

(१ ते ५ HP)

स्वयंम कृषी तंत्रज्ञान





भारत हा कृषीप्रधान देश आहे. शेतकरी या देशाचा आर्थिक कणा. सगळ्या देशाच्या पोटाची भूक मिटवण्यासाठी शेतकरी अहोरात्र कष्ट करत असतो. मात्र असे असलेतरी शेती हा बिन भरवश्याचा व्यवसाय झाला आहे. त्यामुळे आपल्याकडे असणाऱ्या मबुलक पाण्याचे नियोजन व्यवस्थित करून शेतकरी राजाला शेती करावी लागते.कारण पाण्याची उपलब्धता असली तरी ग्रामीण भागात तासंतास लोडशेडिंग असते. विजेच्या अनियमिततेमुळे रात्री अपरात्री शेतकरी राजाला शेताला पाणी देण्यासाठी जावे लागते. मोटार चालू व बंद करण्यासाठी सतत हेलपाटे घालावे लागतात. साप, विंचू ,माकडे, रानडुकरे ,बिबट्या अशा हिंस्र प्राण्यांच्या भितीपोटी जीव मुठीत घेऊन रात्री घराबाहेर पडावे लागते. दरवर्षी कित्येक तरी शेतकरी बांधव हिंस्र प्राण्यांच्या हल्लात जखमी होतात. रात्रीच्या अंधारात विजेचा शॉक लागुन जिवाला मुकतात.

यासाठी बळीराज्याच्या सुरक्षिततेसाठी,त्यांचे कष्ट कमी करून स्मार्ट शेती करण्यासाठी FLUX ELECTRONICA INDIA PRIVATE LIMITED ने मेक इन इंडिया व आत्मनिर्भर भारत अभियाना अंतर्गत स्वयंम डिजिटल मोबाईल ऑटो तंत्रज्ञान विकसित केले आहे. या माध्यमातून शेतकरी राजा आणि त्याच्या कुटुंबातील सदस्य घरबसल्या शेतातील मोटर कधीही कॉल व मेसेज द्वारे नियंत्रीत करू शकता.

यामुळे शेतकरी राजाचे कष्ट वाचून त्यांना नक्कीच दिलासा मिळेल याची आम्हाला खात्री आहे.

- **<u>वैशिष्ट्ये :</u>**

१) जगातनू कुठूनही कॉल तसेच मेसेजद्वारे आपली मोटर नियंत्रित करू शकता.
२) तांत्रिक अडचणी असल्यास मोटर लगेच बंद करून आपणास कॉल व मेसेजद्वारे माहिती मिळते.
३) CT कॉईलमुळे तंतोतंत ड्रायरन सुविधा तसेच ड्रायरन नंतर ऑटोमॅटिक मोटर चालू करण्याची टायमर सुविधा .
४) डिजिटल डिस्प्लेवर व्होल्टेज,करंट, सिम कार्डची रेंज तसेच तांत्रिक फॉल्ट असल्यास दाखवतो.
५) स्वयंम ट्रॅकिंग सुविधेमुळे मोबाईल ऑटो चोरी गेल्यास पुन्हा मिळववता येतो.
६) आपण सेट केलेल्या वेळेनुसार मोटर ऑटोमॅटिक चालू व बंद करता येते.
७) सिमकार्ड ला तांत्रिक अडचणी आल्यास साध्या ऑटो सारखे काम करतो.
८) 24 तास बॅटरी बॅकअप.
९) स्टार्टर चा ON DELAY टाईम सेट करता येतो.
१०) मोटर ला काही फॉल्ट झाल्यास उदा.फुटबॉल गाळात फसणे,मोटर बेअरिंग जाम होणे, कॉइल जास्त करंट घेणे, व्होल्टेज जास्त-कमीमुळे कॉन्टॅक्टर जॅम होणे,मोटरची वायर अथवा स्टार्टरचे कनेक्शन व्यवस्थित न झाल्यास या सर्व घटकांची माहिती मेसेज व कॉल द्वारे कळवण्यात येते.
११) वीज परुवठा सरुळीत तसेच खंडित झाल्यावर मेसेज व कॉल करून कळवतो.
१२) वेळोवेळी मोटरची व वीजेची स्थिती पाठवतो.
१३) स्वयंचलित ग्राहक सुविधा.

- **<u>मोबाइल ऑटो स्टार्टरला जोडताना घ्यावयाची काळजी:</u>**

१) स्टार्टरचा मुख्य पुरवठा बंद करणे.
२) ज्या ठिकाणी स्टार्टर बसवत आहे त्या ठिकाणी JIO,AIRTEL ,BSNL , IDEA VODAFONE(VI) यापैकी कोणत्या सिमकार्डला रेंज आहे ते तपासून घ्यावे व ते सिमकार्ड टाकावे.
तसेच सिमकार्ड कंपन्यांनी प्रत्येक महिन्याला रिचार्जे करण्याची अट केल्यामुळे सिमकार्ड चालू असल्याची खात्री करावी.
३) मोटरला काही फॉल्ट झाल्यास आपल्याला SMS व CALL येण्यासाठी मोबाईल ऑटो मधील सिमकार्ड मध्ये बॅलेन्स असणे गरजेचे आहे.
४) मोबाईल ऑटो ला नेटवर्क(रेंज) कमी मिळत असेल तर अँटेना ची वायर ३ फेज लाईन वायर पासून दूर ठेवावी व अँटेना उंची वर ठेवावा

- स्टार्टर साठीची जोडणी प्रकिया:

१)फेज ची वायर **P** पॉईंट व न्युट्रल ची वायर **N** पॉईंट ला लावणे.
२)मोटर ची लाल वायर **M1** ,पिवळी वायर **M2**,निळी वायर **M3** या पॉईंट ला लावणे